**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

**दिनांक २८/१०/२०२४ (सोमवार) सकाळ**

## खापरखेडा पोलीसांनी घरफोडीचा गुन्हा केला उघड

पोस्टे खापरखेडा यांची कारवाई

दिनांक २४/१०/२०२४ रोजी फिर्यादीचे घराचा कुलूप तोडून कोणीतरी अज्ञात चोराने सोन्या चांदीचे दागिने व नगदी ८००० रुपये असा एकूण ६ लाख १५ हजार ५०० रुपयाच्या मुद्देमाल चोरून नेल्याची फिर्यादी चे रिपोर्ट वरून अपराध क्रमांक ६७८/२०२४ कलम ३०५, ३३१ बी.एन.एस अन्वये गुन्हा दाखल करून तपासात घेतला. तपासा दरम्यान पोलीसांना माहिती प्राप्त झाली की, संशयित आरोपी लालितकुमार परमार रा. खापरखेडा याने सदरचा गुन्हा केला. त्यावरून त्याची विचारपुस केली असता फिर्यादीचे मुलीचे व त्याचे ०२ वर्षापासुन प्रेमसंबंध असुन फिर्यादीच्या मुलीच्या मदतीनेच त्याने सदरची घरफोडी केल्याचे उघड झाले. आरोपीस अटक करण्यात आली असुन सदर गुन्हयात नगदी ५००० रू., ३ ताळे सोन्याचे मंगळसुत्र, ४ ग्रॅम सोन्याचे कानातले, ३ तोळे सोन्याची चपलाकंठी, १ तोळयाचा सोन्याचा गोप, अडीज ग्रॅम सोन्याचे रिंग, ३ ग्रॅम सोन्याचे कानतले झुमके, ५ तोळे चांदीची पायपटटी असा एकुण ४,२२,५००/— रू चा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन पुढील तपास सुरू आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष ए पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग कन्हान श्री. संतोष गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे खापरखेडा येथील ठाणेदार अरविंदकुमार कतलाम, सपोनि पोउपनि आरती नरोटे, डी.बी. पथक येथील प्रफुल राठोड, शैलेश यादव, प्रदीप मने, कविता गोंडाने, राजु भोयर, राजकुमार सातुर, शेखर वानखेडे यांचे पथकाने पार पाडली आहे.



## अवैधरीत्या शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पोलीस स्टेशन खापरखेडा येथील डी. बी. पथक यांना दि. २७/१०/२०२४ रोजी मुखबीर द्वारे माहिती मिळाली की, **आरोपी नामे– हेमंत उर्फ सुदामा चापा डहाके, वय २४ वर्ष, रा. चिचोली खापरखेडा याचे**कडे माउझर आहे अशा माहिती वरून पोलीस स्टेशन खापरखेडा येथील डी.बी. पथकाने आरोपी **हेमंत उर्फ सुदामा चापा डहाके** यास ताब्यात घेवुन सविस्तर विचारपुस केली असता आरोपीने शमशान भुमी चिचोली येथे झाडाखाली दगडाखाली एका पिशवीत एक देशी कटटा माउझर कि. ३५०००/– रूपयाची ठेवली असल्याचे सागीतली ते जप्त करून आरोपी विरूध्द पोस्टे खापरखेडा येथे कलम ३/२५ आर्म ॲक्ट सहकलम १३५ मो.वा.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष ए पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण, मा. उपविभागिय पोलीस अधिक्षक संतोष गायकवाड सा. यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे खापरखेडा येथील ठाणेदार अरविंदकुमार कतलाम, सपोनि अमरदीप खाडे, पोउपनि आरती नरोटे, डी.बी. पथक येथील प्रफुल राठोड, शैलेश यादव, कविता गोंडाने, राजु भोयर, राजकुमार सातुर यांचे पथकाने पार पाडली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर